**महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग**
**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय**
**डॉ. नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-४११००१.**

सत्यमेव जयते

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा निबंधक विवाह मंडळ व विवाह
(विभागस्तरीय समन्वय)
महाराष्ट्र राज्य, पुणे

कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०
मा.सं. विभाग ☎:- ०२० - २६०५८६१०
फॅक्स क्रमांक :- ०२० - २६०५८२९२
ई-मेल :- mahvivah@gmail.com

आरोग्य सेवा जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८२/विवाह नोंदणी/वै.अ/अधिसुचना 2245-2317/१७
दिनांक - ३१/०१/२०१७.
1-2-2017

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद ...(सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक ... (सर्व)
कार्यकारी आरोग्य अधिकारी, महानगर पालिका, मुंबई
आरोग्य अधिकारी, महानगर पालिका, ............... (सर्व)

**विषय** :- विवाह नोंदणी कार्यक्रमासाठी वैद्यकीय अधिकारी यांना "निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी" म्हणून घोषित केलेबाबत.......

**संदर्भ** :- शासन अधिसूचना क्रं याचिका-२०१६/प्र.क्रं.८८/कु.क. दि. ११ नोव्हेंबर २०१६

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.५२/२०१३ (श्रीम. प्रिस्किलिया सॅम्यूअल विरुध्द युनियन ऑफ इंडिया आणि इतर) प्रकरणी दिनांक २३ मार्च,२०१६ रोजी निर्देशित केल्याप्रमाणे, राज्य शासनाने राज्यातील प्रभाग अधिकारी, महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायत तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, कटक मंडळे यांचेकडील विवाह नोंदणीचे कामकाज काढून घेतलेले आहे. संदर्भाधीन अधिसुचना अन्वये पुर्वीच्या नियुक्त केलेले अधिकारी ऐवजी संबंधित क्षेत्रासाठी **वैद्यकीय अधिकारी महानगर पालिका/ नगर पालिका/नगर पंचायत/ कटक मंडळे** यांना **"निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी"** म्हणून घोषित केलेले आहे. आपल्या माहितीसाठी सदर अधिसुचनेची मराठी व इंग्रजी भाषेतील प्रत पुन्हा सोबत जोडली आहे.

सदर अधिसूचनेव्दारे घोषित केलेले **वैद्यकीय अधिकारी** यांचेवर **विवाह मंडळ व विवाह नोंदणीचे** काम करण्याची नव्याने जबाबदारी आलेली आहे. विवाह नोंदणी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याबाबत या कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेले परिपत्रक व मार्गदर्शक सुचना यासोबत पुन्हा जोडून पाठविण्यात येत आहे. विवाह नोंदणीसाठी ठेवावयाचा विवाह नोंदवहीचा नमुना सोबत जोडलेला आहे.

वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना विवाह नोंदणीसाठी निबंधक घोषित केले नसल्याने, ज्या नगर पालिका/परिषद क्षेत्रात ग्रामिण रुग्णालय नाही, अशा ठिकाणच्या मुख्याधिकारी, नगर पालिका/परिषद यांनी पुढील आदेश होईपर्यंत नियमितरित्या विवाह नोंदणी कार्यक्रमाचे कामकाज पार पाडावे. ग्रामिण भागातील सर्व ग्रामसेवक हे विवाह नोंदणी कार्यक्रमासाठी **"निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी"** म्हणून पुर्वी प्रमाणेच कार्यरत राहतील त्यात कोणत्याही प्रकारचा बदल झालेला नाही.

आपणांस विनंती की, आपल्या कार्यक्षेत्रातील नागरी भागातील सर्व संबधित विवाह निबंधकाच्या नजरेस ही बाब आणून दयावी. या अधिसूचनेव्दारे नियुक्त करण्यात आलेले सर्व वैद्यकीय अधिकारी यापुढे विवाह नोंदणी बाबतची सर्व कामे पार पाडतील याकडे लक्ष दयावे. त्यांना

Scanned by CamScanner

विवाह नोंदणी बाबतच्या अधिसुचनेसह परिपत्रक व मार्गदर्शक सुचना आपले स्तरावरुन पाठवाव्यात व त्याची पोच पावती घेण्यात यावी. तसेच आपण केलेल्या कार्यवाहीचा पुर्तता अहवाल उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ) पुणे-१ यांना न चुकता सादर करावा.

सहपत्र :- १) शासन अधिसूचना, दिनांक ११ नोव्हेंबर,२०१६
२) विवाह नोंदणी बाबतचे परिपत्रक व मार्गदर्शक सुचना
३) विवाह नोंदणीसाठी ठेवावयाचा विवाह नोंदवहीचा नमुना

उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजिआ), तथा
निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी (विभागीय समन्वय)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत सादर :- मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रिय आरोग्य अभियान, आयुक्तालय, आरोग्य भवन, मुंबई.

मा. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत सस्नेह : उपसंचालक आरोग्य सेवा, आरोग्य मंडळ, .......... (सर्व) त्यांना विनंती की, त्यांनी संबधीत कार्यालयास वैद्यकीय अधिका-यांमार्फत विवाह नोंदणीचे काम सुरळीत होईल यासाठी पाठपूरावा करावा.

Scanned by CamScanner